बीड । गुरूवार

२०.०३.२०२५

वर्षे : ४ अंक : ३४१

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955











## ‘ज्ञानराधा’ संचालकमंडळाचा 42 लाखाचा मुद्देमाल जप्त



**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सो.लि. बीड चे आरोपी संचालक मंडळ व इतर अधिकारी / कर्मचारी यांचे नावावर असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तांची मा. नोंदणी महानिरीक्षक, यांचे कार्यालय, पुणे येथुन व स्थानिक सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे बीड जिल्हयातील विविध शाखे मधुन माहिती प्राप्त केली असता सदर मल्टीस्टेट मधील चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ यांचे नावे असलेली स्थावर मालमत्तेची माहिती प्राप्त करुन ४२,१७,४९० /- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे सदरील प्रकरण पुढील कारवाईसाठी अपर पोलीस महासंचालक मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो. लि.बीड चे बीड जिल्हयात २३ शाखा असुन सदर मल्टीस्टेट विरूद्ध बीड जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला आजपावेतो ७६ गुन्हे दाखल झाले असुन फिर्यादी मधील एकुण ४७,९९,९२,३६८/- रूपयाचा अपहार झाले बाबत तक्रारीमध्ये नमुद आहे. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेटचे आजपावेतो आर्थिक गुन्हे शाखा, बीड येथे एकुण ११५२७ठेवीदार त्यांच्या एकुण–

▶▶ उर्वरित पान २ वर

## रामराज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही

### मौजे चकलांबा ग्रामपंचायतीच्या अतिक्रमणाचा प्रश्न आ. विजयसिंह पंडित यांनी सभागृहात मांडला

**मुंबई । प्रतिनिधी**

अतिक्रमण दूर करण्याचे काम ग्रामपंचायत करते मात्र चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर अतिक्रमण करून कचरा डेपोचे काम सुरु केले आहे. महायुतीच्या काळात ‘रामराज्य’ सुरु असल्याचे लोक सांगतात मात्र या रामराज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही अशी खंत आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत व्यक्त केली. गेवराई तालुक्यात सुरु असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांची



चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना आ.विजयसिंह पंडित विधानसभेत बोलत होते.

जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहार आणि चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर केलेले कचरा डेपोचे अतिक्रमण या दोन विषयाला आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत वाचा फोडली. यावेळी बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जलजीवन मिशन अंतर्गत गेवराई तालुक्यातील १९२ गावांसाठी १७२ कोटी रुपये किंमतीच्या १७७ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजुर आहेत. विहित मुदतीत एकाही योजनेचे काम पूर्ण झालेले नाही. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु होत आहेत. १९२ गावांपैकी १०% गावात सुध्दा सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. वॅपकॉस प्रा. लि. सारख्या तांत्रिक सेवा पुरवठादार कंपनी आणि संबंधित विभागातील अधिकारी यांच्या संगणमताने शासनाचा कोट्यावधी

▶▶ उर्वरित पान २ वर

## गावकऱ्यांनी व्यक्त केले आ.प्रकाश सोळंके, जयसिंग सोळंके यांचे आभार.

### उपळी कुंडलिका धरणातून पाणी सोडले ; १३ गावे अन् वाड्या वस्त्यातांड्याना दिलासा

**वडवणी । प्रतिनिधी**

आ.प्रकाश सोळंके यांच्या प्रयत्नातून व युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते उपळी येथील कुंडलिका धरणातून १९ मार्च २०२५ बुधवारी रोजी सकाळी ११ वाजता नदीपात्रात पाणी सोडण्यात आले.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील उपळी येथील कुंडलिका धरणातून शेतकऱ्यांच्या हितासाठी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी समस्त गावकऱ्यांच्या वतीने



आ.प्रकाश सोळंके यांच्या कडे केली जात होती. या मागणीला प्रथम प्राधान्य देत आ.प्रकाश सोळंके यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकारी यांनी धरण साईटवर जाऊन पाणीसाठा किती प्रमाणात शिल्लक आहे. याची चाचपणी केली आणि आ. प्रकाश सोळंके यांच्या सुचनेनुसार लागलीच प्रकिया सुरू केली. या धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी खुद्द माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग सोळंके यांनी उपस्थिती दर्शवुन नदी पात्रात पाणी सोडण्याचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचा व अधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार केला. नदी पात्रात पाणी सोडल्याने धरणाखालील

▶▶ उर्वरित पान २ वर






## विहीर खोदताना जिलेटीनच्या कानडीचा स्फोट ; एक ठार, तीन गंभीर जखमी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील तळेगाव तांडा येथे विहीर खोदताना मोठी दुर्घटना झाल्याची माहिती समोर येत आहे. सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार तळेगाव तांडा येथील



एका शेतकऱ्याच्या शेतात विहीर खोदण्याचे काम सुरु असताना आदल्या दिवशी अनवधानाने शिल्लक राहिलेल्या जिलेटीनच्या कानडीचा प्रचंड स्फोट झाला. हा स्फोट एवढा मोठा होता की, विहिरीत काम करणारे चारही कामगार विहिरीच्या वर उडून पुन्हा आतमध्ये पडले. या स्फोटात एक जण जागीच ठार तर तिघे गंभीर जखमी झाले आहेत. तीनपैकी दोन जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

## शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधणार

### जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुखांवर नितांत श्रद्धा आणि त्यांच्या विचारांशी एकनिष्ठ असणारा शिवसैनिक आजही प्रत्येक गावात आणि घराघरात आहे. बीड जिल्हा सुद्धा याला अपवाद नाही. वीस वर्षापासून एकही आमदार आणि खासदार पक्षाचा नसतानाही आणि अनेकांनी गद्दारी करूनही शिवसैनिक मात्र आजही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांशी बांधील आहे. आगामी काळात जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून पक्षाला उभारी देण्याचे काम प्रामाणिकपणे करणार आहे. शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार आहे असा निर्धार नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व्यक्त केला.

उल्हास गिराम यांची शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर

▶▶ उर्वरित पान २ वर

दैनिक

### मराठवाडा पत्र

वर्धापनदिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

## चतुर्थ वर्धापन दिन

**सर्वांना नमस्कार,! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षामध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई–मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com

वरील नंबर व ई–मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.




# सुनीता विल्यम्स : जिद्द, धैर्य आणि अंतराळाकडे झेप

सुनीता विल्यम्स हे नाव धैर्य, कष्ट आणि आत्म विश्वासाचे प्रतीक आहे. भारतीय वंशाच्या या अमेरिकन अंतराळवीराने जगाला सिद्ध करून दाखवले की, संकटं कितीही मोठी असली तरी जिद्द आणि प्रयत्नांनी आपण कोणत्याही उंचीवर पोहोचू शकतो.

अवघड परिस्थितीतही संयम

सन २००६ मध्ये सुनीता विल्यम्स आपल्या पहिल्या अंतराळ मोहिमेवर गेल्या. त्यांनी तब्बल १९५ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात घालवले, जे त्या काळात एका महिलेचा विक्रम होता. पण अंतराळ प्रवास हा सहज सोपा नसतो. शून्य गुरुत्वाकर्षण, मर्यादित संसाधने आणि पृथ्वीपासून हजारो किलोमीटर दूर असणे – हे सर्वच आव्हानात्मक होते.

त्यानंतर, २०२४ मध्ये, बोइंग स्टारलाइनर यानाच्या तांत्रिक अडचणींमुळे त्यांच्या अंतराळ प्रवासात विलंब झाला. पण सुनीता विल्यम्स घाबरल्या नाहीत, त्यांनी परिस्थितीला



सामोरे जात शांतपणे योग्य संधीची वाट पाहिली.

न हारता पुढे जाणे – हेच खरे यश!

सुनीता विल्यम्स यांचा प्रवास आपल्याला शिकवतो की, कठीण परिस्थितीमध्येही शांत राहणे आणि जिद्द न सोडणे हेच आपल्याला यशाच्या शिखरावर पोहोचवते. संकटे आली तरी त्यांना संधीमध्ये बदलण्याची क्षमता आपल्यात असायला हवी.

प्रत्येक स्वप्न शक्य आहे!

सुनीता विल्यम्स यांनी एकदा सांगितले होते –

जर तुम्हाला अंतराळवीर बनायचं असेल, पायलट व्हायचं असेल किंवा कोणतेही मोठे ध्येय गाठायचे असेल, तर त्यासाठी मेहनत करावी लागेल. संकटे येतील, अपयश मिळेल, पण जर तुम्ही तुमच्या ध्येयावर ठाम राहिलात, तर तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही!

तर मग, संकटे आली तरी हार मानू नका. तुमची जिद्द, मेहनत आणि धैर्यच तुम्हाला यशस्वी करेल!

# उन्हाळ्यात पशु-पक्षांची काळजी घेऊया



लोकसंख्या जशी वाढत गेली तशी माणसाच्या मूलभूत गरजा पुरवणारी नैसर्गिक साधने कमी पडू लागली. शहरासारख्या ठिकाणी राहण्यासाठी टोलेजंग इमारती उभारल्या जाऊ लागल्या, वाहतुकीसाठी नवनवीन महामार्ग, उड्डाणपूल तयार केले जाऊ लागले, वीजनिर्मितीसाठी निरनिराळे प्रकल्प उभारले जाऊ लागले आणि यासर्व बाबींना 'विकास' असे गोंडस नाव दिले गेले. मागील ३०-४० वर्षांत विकासाच्या नावाखाली झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात आली आहे. नैसर्गिक संपत्तीवर जीवन असलेल्या प्राणिमात्रांचे, पशुपक्षांचे जीवन मात्र यामुळे धोक्यात येऊ लागले. लोकवस्त्या निर्माण करण्यासाठी मानवाने जंगलांवर अतिक्रमण केले, डोंगर नद्या कह्यात घेतल्या. बुद्धिमान मनुष्यप्राण्यापुढे आपले काही चालणार नाही म्हणून प्राण्यांनी आपली स्थाने बदलली. गेल्या दहा-बारा वर्षांत देशासह राज्यात नैसर्गिक कोप झाल्यासारखी परिस्थिती उद्भवू लागली आहे. ऋतुचक्रात फेरफार होऊ लागला आहे. अतिवृष्टीनंतर यंदा सर्वांना उष्माघाताचा सामना करावा लागत आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीवर केलेल्या अतिक्रमणाचेच हे दुष्परिणाम आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. उन्हाच्या तडाख्यामुळे आज मनुष्यप्राणी हवालदिल झाला असला, तरी कृत्रिम थंडावा निर्माण करण्यासाठी त्याच्याकडे पंखे, कुलर, वातानुकूलित यंत्रे यांसारखी आधुनिक साधने आहेत, पशुपक्षांना मात्र सर्वस्वी नैसर्गिक थंडाव्यावर अवलंबून राहावे लागते. शहरासारख्या ठिकाणी वृक्षतोडीमुळे हा गारवा नष्ट झाला आहे.

अन्नाच्या आणि पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांत, शहरांत येणाऱ्या पक्षांना उष्माघाताचा सामना करावा लागतो. गेल्या वर्षी उन्हाळ्यात नवीमुंबई, ठाणे आणि रायगड परिसरात प्रतिदिन १०० हुन अधिक प्राणी-पक्षी घायाळ होत होते तर रोज १५ ते २० पक्षांचा आणि प्राण्यांचा मृत्यू होत होता. अन्य शहरांतही काहीशी अशीच स्थिती होती. अन्न-पाण्याच्या शोधात प्रखर उन्हातून फिरताना हे पक्षी चक्कर येऊन जमिनीवर कोसळतात ज्यामुळे त्यांच्या पंखांना आणि पायांना इजा होते. अशा जखमी अवस्थेत कोसळलेल्या पक्षांवर कुत्रे मांजरी हल्ला करतात त्यामळे त्यांची परिस्थिती आणखी बिघडते. वटवाघूळ, माकडे, खार, कोकिळा, पोपट, घार, कावळे, चिमण्या यांसारखे पशु पक्षी प्रतिदिन घायाळ होऊन रस्त्यांवर पडत आहेत. पशु पक्षांवर ही जी काही प्रतिकूल परिस्थिती ओढवली आहे त्याला सर्वस्वी मानव जबाबदार असून त्याचे प्रायश्चित्त म्हणून उष्णतेने हवालदिल झालेल्या या पशु पक्षांसाठी प्रत्येकाने काहीनाकाही करायला हवे. आपल्या घराच्या खिडकीमध्ये, बाल्कनीमध्ये पक्षांना सहज उपलब्ध होईल असे धान्य, खाद्य आणि पाण्याची व्यवस्था करा तसेच ते पाणी नियमितपणे बदला. काही पक्षीमित्र संघटना या दिवसांत पशुपक्षांसाठी ठिकठिकाणी कृत्रिम पाणवठे आणि खाद्याची व्यवस्था करत आहेत. अपुऱ्या निधीमुळे यांना त्यांच्या कार्यात मर्यादा येत आहेत अशा संघटनांशी संपर्क साधून त्यांना सहकार्य करा ! रस्त्यावर कुठे घायाळ अवस्थेतील पक्षी किंवा प्राणी दिसून आला,तर त्याला त्वरित वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी प्रयत्न करा. एरव्ही प्राणिसंग्रहालयांत आनंदाने बागडणारे पशु पक्षी आपणा सर्वांनाच आवडतात. प्राणिसंग्रहालयातील पशु पक्षांना व्यवस्थापनाकडून नियमितपणे पाणी आणि खाद्य पुरवले जाते मात्र बाहेर स्वच्छंदपणे वावरणाऱ्या पशु पक्षांना आपल्या आणि आपल्या पिल्लांच्या अन्न आणि पाण्याच्या शोधात वणवण फिरावे लागते. आज त्यांच्यावर उद्भवलेल्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांना दिलेला अल्पसा आधारही त्यांचे जीवन वाचवू शकतो त्यामुळे ही संधी आपण सोडता कामा नये !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

पान ४ वरून पुढे...

## गुजर समाजाचे...

सामाजिक कार्यात अग्रेसर राहिलेले रतन गुजर यांची नुकतीच अखिल भारतीय गुर्जर देवसेना संघटनेकडून बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे त्याबद्दल त्यांचा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सत्कार करुन म्हटले की, मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख आहे आणि तुम्ही गुजर समाजाचे जिल्हाप्रमुख आहात आपले दोघांचे काम आहे समाजकारण या कार्यामध्ये आपल्याला कोठेही अडचण आल्यास शिवसेना एक परिवार म्हणून तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील व तुमच्या समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शिवसेना तुमच्या बरोबर आहे तसेच याप्रसंगी गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ यांनीही आम्ही आता मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावू तुम्ही काम करत राहा तुमच्या पाठीशी सर्व समाज उभा राहील असे आश्वासन दिले यावेळी तरी या कार्यक्रमाला विनायक गुजर, सुनील गुजर, हनुमान बजरंग गुजर, लक्ष्मण बहिरवाळ व सर्व समाज बांधव उपस्थित होते

## केरसुनीच्या...

मध्ये सरावासाठी संजय दाखल झाला होता. त्याची ट्रेनिंग आता पूर्ण झाली आहे. मुंबई येथील महाराष्ट्र सुरक्षा बलात तो दाखल होणार आहे. यासाठी संजयने गेल्या पाच वर्षांपासून प्रचंड मेहनत घेतली. अंग मेहनती सोबत अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयात १८ तास अभ्यास केला. वेळप्रसंगी ग्रंथालयात झोपल्याचे तो सांगतो. आपल्या आई वडिलांनी केलेल्या कष्टाचे फळ मला मिळाले असून भविष्यात गोरगरीब कुटुंबातील तरुणांनी राजकारणातील कार्यकर्ते होण्यापेक्षा आई-वडिलांचे कष्ट पाहून सुकर भविष्यासाठी योग्य तो निर्णय घेत परिश्रम करावे असं संजय सांगतो.

**आम्ही संजय साठी घेतलेल्या अपार कष्टाचे फळ आम्हाला मिळाले आहे. आमच्या कष्टाचे चिज संजयने केले आहे. आता भविष्यात आमच्या मनातील त्याच्याबद्दलची काळजी मिटली आहे. त्याने सुखात जगावे,आमचा परंपरागत असलेल्या व्यवसायात अपार कष्ट आहेत. रानावनात व दारोदार भटकंती करण्याची वेळ माझ्या मुलावर येणार नाही यामुळे आम्ही आनंदी आहोत.– मसाजी गायकवाड**

**आजकालची तरुणाई मोबाईलच्या पुर्णतः आहारी गेली आहे. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी रील स्टार्स होण्यात त्यांना रस आहे. मात्र संजय गायकवाड ने घेतलेली मेहनत व अपार कष्ट, त्याच्या आई – वडिलांनी दिलेली साथ ही सर्वसामान्य कुटुंबातील सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. – बाबा कांबळे,सामाजिक कार्यकर्ते दिंद्रुड**

## लिंबागणेश ग्रामपंचायत...

जीवन संपवले आहे. ८ वर्षांपासून १९ मार्च २०१९ पासुन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील आणि देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १९ मार्च रोजी अन्नदात्यासाठी एक दिवस उपवास करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाविरोधात प्रभावी संदेश देण्यासाठी शेतकरी आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी कायदे रद्द रद्द करण्यात यावेत.प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी, शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी एल्गार करण्याच्या उद्देशाने संवेदनशील नागरीकांनी एक दिवसाचा कडकडीत उपवास करत आपल्या सहवेदनेचा, पाठिंब्याचा आणि आंदोलनाच्या जाज्वल्य हेतुचा जागर करण्यासाठी अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक उपवास, सामुहिक उपोषण, श्रद्धांजली सभा आदिंचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले असुन या आवाहनाला प्रतिसाद देत किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सामुहिकरीत्या एक दिवस अन्नत्याग आंदोलन करत आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस पाळण्यात आला. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अँड.गणेश वाणी, भगवान मोरे, रामकिसन गिरे, पांडुरंग वाणी, रामचंद्र मुळे,आश्रुबा गिरे, राजेंद्र वायभट, साहेबराव निर्मळ , महादेव ढास, संतोष भोसले, संजय सुकाळे , पत्रकार हरीओम क्षीरसागर आदी सहभागी झाले होते.

पान १ वरून पुढे...

## 'ज्ञानराधा'...

६६०,१९,९९,०६९ /- रूपये रकमेची विश्वासघात व फसवणुक झाले बाबत तक्रारी व त्याबाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहेत. त्यावरून गुन्हयाचे तक्रारी मधील व प्राप्त ठेवीदार यांचे अर्ज असे एकुण-७०८,१९,९१,४३७ /- रूपये रकमेची फसवणुक झालेबाबत माहिती आजपर्यंत प्राप्त झालेली आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ठेविदार यांचे तक्रारी अर्ज स्वीकारण्यासाठी आगुशा बीड येथे स्वतंत्र पथक तयार करण्यात आलेले आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सो.लि. बीड चे आरोपी संचालक मंडळ व इतर अधिकारी / कर्मचारी यांचे नावावर असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तांची मा. नोंदणी महानिरीक्षक, यांचे कार्यालय, पुणे येथुन व स्थानिक सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे बीड जिल्हयातील विविध शाखे मधुन माहिती प्राप्त केली असता सदर मल्टीस्टेट मधील चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ यांचे नावे असलेली स्थावर मालमत्तेची माहिती प्राप्त करुन एमपीआयडी प्रस्ताव पुढील कायदेशीर कारवाईसाठी जा.क्र.वाचका/आ.गु.शा./रा.म/एमपीआयडी /प्रस्ताव/२०२५- ४१५ बीड दि. १७/०३/२०२५ अन्वये. मा.अपर पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचे तपासामध्ये चार वाहने (जीप), तीन सीपीयु व मुख्य कार्यालय बीड येथुन महत्त्वाचे दस्तऐवज असा एकुण रुपये ३२,८०,०००/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मुख्य शाखेचा पंचनामा करून ६,३४,३९०/- रोख रक्कम तसेच सारडा संकुल शाखेतुन ७३ ग्रॅम सोन व अंदाजे २५० ग्रॅम चांदीच्या मौल्यवान वस्तु जप्त केले असुन त्याची एकुण-किंमत- ३,०३,१००/-रू किंमतीचे मौल्यवान दागीने जप्त करण्यात आलेले आहे त्यांची एकुण किंमत- ४२,१७,४९० /- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे. तसेच सदर गुन्हयामध्ये आजपावेतो संचालक मंडळातील व इतर अधिकारी कर्मचारी यांचे एकुण-२५६ बँक खाते निष्पन्न केलेले आहे. त्यापैकी चालु स्थितीत असलेले बँक खाते ४७ आहेत त्यापैकी ४४ बँक खाते फ्रिज केलेले असुन त्यामध्ये ६९,२८,६३६/- रूपये फ्रिज करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र ठेवीदार वित्तीय संस्थेतील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम (चझखऊ उढ) १९९९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी एमपीआयडी प्रस्ताव मा. अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी मा.विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छ.संभाजी नगर परीक्षेत्र, छ. संभाजीनगर, मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड, मा. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, विश्वांभर गोल्डे उपविपोअ बीड तथा पोलीस उप अधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ, सहा. पोलीस निरीक्षक, पांडुरंग भागीले, सपोनि रत्नाकर घोळवे, व पोलीस अंमलदार सहा फौजदार मुकुंद तांदळे, मच्छिंद्र राख, अभिमान भालेराव, पोलीस हवालदार रामदास, विठठल, पोशि. संजय पवार व इतर अंमलदार यांनी केलेली आहे.

## रामराज्यात श्रीराम...

रुपयांचा निधी अक्षरशः वाया गेला आहे. प्रगती कन्स्ट्रक्शन सारख्या कंत्राटदाराने कोट्यावधी रुपयांची देयके उचलून पोबारा केला आहे. त्यामुळे या सर्व योजनांच्या कामाची चौकशी करण्यासाठी एसआयटी गठीत करण्याची मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली. मौजे चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर केलेल्या अतिक्रमणाबाबत बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापनासाठी चकलांबा ग्रामपंचायतीला निधी मंजुर झाला. मात्र या ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान या नोंदणीकृत ट्रस्ट मालकीच्या गट क्र.५७१ मधील जमीनीवर कचरा डेपोचे काम सुरु केले आहे. या ग्रामपंचायतीचा कारभार याच सरकारमधील क्लास वन अधिकारी हाकत आहेत. 'अधिकारी-अधिकारी' अशी मिलीभगत सुरु असल्यामुळे आता श्रीराम सुध्दा चकलांबा सारख्या गावात सुरक्षित नाहीत. महायुतीच्या काळात रामराज्य सुरु असल्याचे काही लोक सांगतात मात्र याच सरकारच्या काळात श्रीराम देवस्थानाची जमीन आपण वाचवू शकतो का ? असा सवालही आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केला. चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती खेडकर यांच्या कार्यकाळात श्रीराम देवस्थानाच्या जमीनीवर अतिक्रमण होत असल्याची तक्रार पवन लाहोटी यांनी केली होती. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे यांनी हे काम स्थगित करण्याऐवजी देवस्थानच्या जागेत अतिक्रमण आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना गटविकास अधिकारी यांना लेखी पत्राद्वारे केल्या आहेत. कागदी घोडे नाचवून प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे हे चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच खेडकर यांना पाठिशी घालत आहेत का ? असा सवाल चकलांबा ग्रामस्थ विचारत आहेत.

## गावकऱ्यांनी व्यक्त..

उपळी, लोनवळ बाबी, कुप्पा, सुलतानपुर, दुकडेगांव, चिंचाळा, धानोरा, राजेवाडी, केंडेंपिंप्री, पुनंदगांव, परडी माटेगांव सह आदी वाड्या, वस्त्या, तांड्यावरील गावांना, शेतकऱ्यांना, पशुधनांना या मुळे मुबलक पाणी मिळणार आहे.यावेळी माजी सभापती प्रशांत सावंत, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, सभापती संभाजी शिंदे, डॉ.दत्तात्रय दुधाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, नगरसेवक सचिन सानप, माजी सरपंच सुभाष सावंत, माजी सरपंच प्रविण सावंत, चेअरमन दत्तात्रय मायराने,वसंत आबा सावंत, युवा नेते ॲड.आनंद काळे, तानाजी आजबे, संचालक सचिन लंगडे, सरपंच माधव शेंडगे, सरपंच सुभाष आजबे,रामराव पवार, ज्ञानोबा राठोड, रामराव चव्हाण,बबन भिसे, सरपंच प्रल्हाद सोनवणे, दिनेश सावंत, वसंत वडचकर, नारायण बडे, ड.प्रदिप शेळके,शेख ताहेर, सचिन हलकर, विजय मोरे, राजाभाऊ काळे,बबन आडे सह आदींची उपस्थिती होती.

## शिवसेनेने टाकलेला...

शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. उल्हास गिराम यांनी आतापर्यंत पक्षाचे काम एकनिष्ठतेने केले आहे. ठिकठिकाणी त्यांच्या सत्काराचे आयोजन केले जात आहे. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. उल्हास गिराम म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे तो विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी माझी आहे. आजही बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात आणि प्रत्येक घरात निष्ठावंत शिवसैनिक आहेत. गेल्यास वीस वर्षापासून शिवसेनेचा आमदार किंवा खासदार नसतानाही आणि अनेकांनी पदे मिळवून गद्दारी केलेली असतानाही बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेची ताकद आहे. त्या ताकदीला एकत्र करण्याचे काम आमचे आहे. जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून नव्या उमेदीने कामाला लागायचे आहे. बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा शिवसेनेचा झंझावात निर्माण करायचा आहे असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ही, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ही, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शासकीय कार्यालयांमध्ये तंबाखू सेवन करणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करा : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**लातूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने कॅन्सरसारखे गंभीर आजार होतात. अशा आजाराने मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांवर संकट कोसळते. यासोबत या पदार्थांचे सेवन अस्वच्छतेला कारणीभूत ठरत असल्याने शासकीय कार्यालयात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केल्या. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत आयोजित विविध समितींच्या आढावा बैठकीत






जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, निवासी आरोग्य अधिकारी डॉ. अशोक सारडा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आनंद कलमे, लातूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकर भारती, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, आरोग्य विभागातील अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आजार जीवघेणे असल्यामुळे या पदार्थांच्या व्यसनापासून सर्वांनी दूर राहणे आवश्यक आहे. या व्यसनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यासाठी आरोग्य विभागाने समुपदेशन आणि जनजागृती उपक्रमांचे आयोजन करावे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने कॅन्सरसारखा आजार होवून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. प्रत्येक ग्रामीण रुग्णालय स्तरावर राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमासाठी स्वतंत्र पथक स्थापन करावे. यामध्ये आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यासोबत पोलीस, महसूल, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश करावा. या पथकाने प्रत्येक आठवड्यात अचानकपणे गुटखा विक्रीच्या अनुषंगाने तपासणी मोहीम राबवावी, असे त्यांनी सांगितले.

सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्याच्या सूचना- जिल्ह्यात स्त्रीभ्रूणहत्या होवू नयेत, यासाठी आरोग्य विभागाने सतर्क राहणे आवश्यक आहे. सध्या याबाबतच्या कोणत्याही घटना जिल्ह्यात घडलेल्या नसल्या तरी खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरची अचानक तपासणी करण्याची मोहीम प्रत्येक ग्रामीण रुग्णालय स्तरावर राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र कायद्याबाबत जिल्ह्यात प्रशिक्षणाचे आयोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

१० ऑक्टोबर २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या तंबाखू मुक्त युवा अभियान अंतर्गत तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनमुक्तीविषयी जनजागृतीकरिता आयोजित रिल्स स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त उमेश गावकरे यांना ७ हजार रुपये, द्वितीय क्रमांक प्राप्त डॉ. सिद्धेश्वर हुकीरे यांना ५ हजार रुपये व तृतीय क्रमांक प्राप्त कपिल वाघमारे यांना ३ हजार रुपयांचा धनादेश व स्मृतिचिन्ह देवून जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

### जिल्हा महिला व बाल विकास विभागाने रोखले १३१ बालविवाह

## बालविवाहाच्या २ प्रकरणात गुन्हे दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात बालविवाह निर्मुलन कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे. जिल्हा महिला व बाल विकास विभागाने चालु वर्षात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्यातील एकुण १३१ बालविवाह रोखले आहेत. तसेच जानेवारीपासुन आजपर्यंतच्या कालावधीत बालविवाहाच्या २ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे यांनी दिली.




बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध अधिनियम संपुर्ण जिल्ह्यात लागू करण्यात आलेला आहे. कायद्यान्वये विवाहासाठी मुलीचे वय १८ तर मुलाचे वय २१ वर्षे पुर्ण असणे बंधनकारक आहे. तसे नसल्यास विवाहास उपस्थित नातेवाईक, मंडपवाले, पुरोहित, आचारी हे कायद्यानूसार दंडात्मक कारवाईस पात्र ठरतात. अधिनियमानूसार दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतुद आहे. प्रशासनाकडून बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक तर शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे बालविवाहाला प्रतिबंध घालण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात जनजागृतीपर आणि प्रतिबंधात्मक विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

ग्रामस्तरावर बालविवाह थांबविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्रास होत असल्यास त्यांना पोलिस संरक्षण तात्काळ पुरविण्यात येते. बालविवाह झाल्यास त्या बालिकेवर खेळण्या-बागडण्याच्या वयात कुटुंबाची जबाबदारी लादली जाते. यामुळे मुलीची शारिरीक व बौध्दीक वाढ परिपूर्ण होवू शकत नाही.

गावात ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आदि ठिकाणी चाईल्डलाईनचा १०९८ हा हेल्पलाईन क्रमांक नमुद करण्यात आलेला आहे. तरी आपल्या गावात बालविवाह होत असल्यास जागरुक व्यक्तींनी चाईल्डलाईनच्या टोल फ्री १०९८ या क्रमांकावर माहिती कळवावी, यामध्ये आपले नाव गोपनीय ठेवण्यात येईल असा संदेश भिंतीवर जनजागृतीसाठी रंगीत स्वरुपात नमुद करण्यात आलेला आहे.

## वारकरी संतांनी सांगितलेला खरा व्यवहारिक धर्म समजून घ्यायला हवा - ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे

**बीड । प्रतिनिधी**

संत नामदेव, संत ज्ञानदेवांपासून संत तुकाराम महाराजांपर्यंत अठरापगड जाती धर्मातील वारकरी संतांनी सांगितलेला खरा व्यवहारिक वारकरी धर्म समजून घ्यायला हवा व समजून सांगायला हवा, धर्माची नशा व जातीची झिंग यातून समाजाला बाहेर काढण्याचे काम वारकरी धर्मच करू शकतो, संतांनी दाखवलेल्या मार्गावरून जर चाललो तर जातीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक गुंता सहज सुटू शकतो असे प्रतिपादन ह भ प समाजप्रबोधनकार संतोष महाराज डोंगरे यांनी केले. बीड पासून जवळच असलेल्या मौजे राजुरी घोडका ता. जि. बीड या ठिकाणी गणेश चतुर्थी निमित्त ह भ प संतोष महाराज डोंगरे यांचे हरिकीर्तन झाले याप्रसंगी ते बोलत होते

धर्माचे पालन । करणे पाखंड खंडण ।।१।।
हे चि आम्हां करणे काम । बीज वाढवावें नाम ।।ध्रु.।।
तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरें ।।२।।
नाही भीड भार । तुका म्हणे सान थोर ।।३।।

या जगद्गुरु तुकोबाराय यांच्या गाथेतील चार चरणांच्या अभंगावर निरूपण करताना ते पुढे म्हणाले धर्माचे पालन करत असताना समस्त समाजातील वासना, द्वेष, अहंकार, तिरस्कार,



राग, लोभ, मत्सर, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड या सर्व पाखंडांचे खंडन करणे होय. त्यासाठी ज्याने त्याने आपापले कर्म इमाने ईतबारे केले पाहिजे. प्रत्येकाचे कर्म हाच त्याचा धर्म असं जर मानलं तर मानवी प्रगतीला चालना मिळू शकते. त्यासाठी ज्याने त्याने आपाआपले कर्म केले पाहिजे. आज शेतात राबणारा शेतकरी आणि सीमेवर उभा असलेला शेतकरी पुत्र सैनिक आपल्या कर्मालाच धर्म मानून कार्य करतात हा आदर्श सगळ्यांनी उरात बाळगला पाहिजे. पाप मुक्ती पुण्यप्राप्ती देवप्राप्तीसाठी वारकरी संतांनी हरिनामाचा जप करणे, नामसंकीर्तन करणे हा सोपा मार्ग सांगितलेला आहे या मार्गाने गेल्यास अंधश्रद्धा आणि कुठल्याही कर्मकांडाची गरज पडणार नाही. वारकरी संतांनी व्यवस्थेविरूध बंड केले ते यासाठीच. सद्यस्थितीत बोगस देव, बोगस संत व बोगस ग्रंथ यापासून सर्वांनी दूर राहिले पाहिजे. महिलांमधील अंधश्रद्धा आणि पुरुषांमधील व्यसनाधीनता कौटुंबिक विकासातील अडथळा बनत आहे. तरुणांमधील व्यसनाधिनता वरचेवर चिंतेचा विषय बनत आहे. व्यसन, अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांपासून आपण दूर राहिलो तर आपली प्रगती कोणीच रोखु शकत नाही. आज शिक्षणाशिवाय पर्याय नाही .जो शिकेल तोच टिकेल हे वास्तव आपण लक्षात घेतलं पाहिजे. त्यासाठी आपण आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. आपल्यातील नको असलेले दुर्गुण बाहेर काढून सद्गुणांची पेरणी केली पाहिजे. जगातील कोट्यावधी लोकांना सुख, शांतता, समाधान, आनंद धर्मच देतो .धर्म म्हणजे सदोदित सत्य, नीती, न्याय. धर्म माणसासाठी असतो माणसं धर्मासाठी नसतात हेही लक्षात घेतलं पाहिजे आणि मानवता धर्माला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. धर्म ही दुधारी तलवार असते त्यामुळे हितही साधले जाऊ शकते आणि हानीही होऊ शकते त्यामुळे त्याबाबतीत काळजी घेणे गरजेचे असते.

## यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दि. २१ ते २४ मार्च कालावधीत संगीतमय भक्तविजय कथा, साई जीवन चरित्र कथा व कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

गत २० वर्षापासून बीड शहरामध्ये स्व.झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने कथा, कीर्तन, प्रवचनाचे आयोजन करण्यात येत असते. भारतीय संस्कृती सर्व जगात श्रेष्ठ आहे. तरुण मनावर अध्यात्मिक विचार रुजावेत या उदात्त विचाराने वर्षामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार, कथाकार, प्रवचनकार यांना आंमत्रित करुन भारतीय संस्कृतीचा कदापिही विसर पडू नये याकरीता प्रतिष्ठान अव्याहतपणे प्रयत्न करत आहे.



त्याला बीडकरांचा उदंड प्रतिसाद मिळत असल्याने प्रतिष्ठान हे कार्य जोमाने करत आहे.

यावेळी ही शुक्रवार दि.२१ ते सोमवार दि.२४ मार्च २०२५ असे चार दिवस रोज सकाळी १० ते संध्याकाळी १० वाजेपर्यंत संगीतमय भक्तविजय कथा व साई जीवन चरित्र कथा तीन सत्रामध्ये आयोजित करण्यात आली आहे. भक्तविजय कथेचे प्रवक्ते ह.भ.प. प्रकाश महाराज काष्टे (परभणी) हे निरुपण करणार आहेत. तसेच साई जीवन चरित्र कथेचे कथा प्रवक्ते अहिल्यानगर येथील ह.भ.प. महाराज हे निरुपण करणार आहेत. गुढी पाडव्याचे औचित्य साधून नवीन वर्षाचे स्वागत अध्यात्माने व्हावे या करीता दि.२४ मार्च रोजी सायं.७ वा. महाराष्ट्रातील ख्यातनाम महिला कीर्तनकार ह.भ.प.शिवलिलाताई पाटील (बार्शी) यांचे विशेष गुढी पाडवा विशेष कीर्तन संपन्न होणार आहे.

## शनिवारी गोंधळी समाज बांधवाची बैठक

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गोंधळी समाज बांधवाची बैठक २२/३/२०२५ रोजी सकाळी १०वाजता श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान बार्शी रोड बीड ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे या बैठकीमध्ये समाजातील विविध प्रलंबित प्रश्नावर चर्चा होऊन त्या निवेदन देण्याचे ठरवण्यात येणार आहे यामध्ये महत्त्वाचे विषय म्हणजे घरकुल योजना, कलाकारांना मानधन,राशन कार्ड, ज्येष्ठ व वयोवृद्ध व्यक्तीला शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळत नाही यासाठी जिल्ह्यातील सर्वांनी एकत्र येऊन त्यावर सविस्तर चर्चा करून त्याचे निवेदन शासनाला द्यावयाचे आहे ,तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त गोंधळी समाजातील नागरिकांनी शनिवार दिनांक २२/ ३ /२०१९ रोजी सकाळी भगवान बाबा प्रतिष्ठान ,बार्शी रोड , हॉटेल गोल्डन चॉइस च्या मागे बीड या ठिकाणी बैठकीसाठी उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्ह्यातील समस्त गोंधळी समाज बांधव यांनी केले आहे.

## पुणे शहरात कौशल्य विकास केंद्र उभारणार : मंत्री उदय सामंत

**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे शहरात शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येत असतात. तसेच रोजगारासाठी येणाऱ्या तरुण – तरुणींची संख्याही मोठी आहे. पुणे शहरात विद्यार्थी, तरुणांच्या कौशल्य विकासात वाढ करण्यासाठी सी.एस.आर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्स बिलीटी) अंतर्गत कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली. पुणे महापालिकेत समाविष्ट गावांतील समस्यांबाबत सदस्य विजय शिवतारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली. या लक्षेवधी सूचनेच्या चर्चेत सदस्य भीमराव तापकीर सहभागी झाले होते. याबाबत उत्तरात मंत्री सामंत म्हणाले, पुणे महापालिकेतील फुरसुंगी आणि उरुळी देवाची गावे वगळून या दोन्ही गावांसाठी नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. लोकसंख्येचा विचार करून ही नगरपरिषद ' अ ' वर्ग दर्जाची करण्याबाबत कोकण विभागीय आयुक्त यांचा अहवाल स्वीकारून दर्जा देण्यात येईल. या नगरपरिषदेला सेवांचे हस्तांतरण पुणे महापालिकेकडून होईपर्यंत पायाभूत सोयीसुविधांची कामे सुरू राहतील. महापालिकेत नव्याने सहभागी गावांमध्ये मालमता कर दुपटीने वसूल न करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. या गावांचा मालमत्ता कर आधीच्या ग्रामपंचायत कराच्या दुपटीपेक्षा जास्त होणार नाही, अशा पद्धतीने पुनर्विलोकन करेपर्यंत हा कर वसूल करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे.

# 'मिशन महाग्राम' अंतर्गत शिक्षण कार्यशाळा

## शाश्वत विकासात सर्वोच्च स्थान शिक्षणाचेच : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

शाश्वत विकास या संकल्पनेत सर्वोच्च स्थान शिक्षणाचे आहे. शिक्षणाने ज्ञानी झालेला समाज हाच विकास व सुधारणांची पूर्वअट आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानअंतर्गत 'मिशन महाग्राम' राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत आज शिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. येथील एमआयटी संस्थेच्या सभागृहात ही कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. शिक्षण उपसंचालक कार्यालयातील शिक्षण निरीक्षक डॉ.सतिष सातव, ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाचे सह. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपसिंग बयास, जिल्हा कार्यक्रम समन्वयक किरण बिलोरे तसेच विभागातील ८





जिल्ह्यातील १६८ गावांमधील शिक्षक, मुख्याध्यापक व ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाचे ग्राम समन्वयक आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, शिक्षणाला शाश्वत विकासात सर्वोच्च स्थान आहे. शिक्षणात सुधारणा करणे हा इतर सुधारणांचा पाया होय. शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करणे म्हणजे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे. आपले विद्यार्थी हे जागतिक स्पर्धेत सक्षम ठरावे यादृष्टीने त्यांच्या क्षमतांचा विकास करणे आवश्यक आहे. वाचन, लेखन, गणिती क्षमतांसोबतच त्यांचे आकलन करणे, विचार करणे ते विचार व्यक्त करणे यासारख्या क्षमताही विकसित करणे आवश्यक आहे. आपण आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत जितके सतर्क असतो तितकेच आपल्याकडे शिक्षणासाठी सोपविलेल्या मुलांबाबतही सतर्क असणे आवश्यक आहे,असे त्यांनी उपस्थित शिक्षकांना उद्देशून सांगितले.

ज्ञान हे सतत अद्यावत होणे आवश्यक असते. त्यासाठी वाचन संस्कृतीला चालना देणे आवश्यक आहे. शिक्षक आणि डॉक्टर हे दोन व्यवसाय समाजात खूप आदरास पात्र आहेत. या दोन्ही घटकांनी आपल्या कर्तव्यात कसूर, हयगय केली तर समाज लयास जाण्याची भिती असते. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या कर्तव्याबाबत अधिक जागरुक असणे आवश्यक आहे. या सोबतच शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर असलेल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हे एक मोठे आवाहन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दिलीपसिंग बयाज यांनी सांगितले की, ग्राम सामाजि परिवर्तन अभियानांतर्गत उद्योगांकडून प्राप्त होणारा सामाजिक उत्तरदायित्व निधी हा दुर्गम गावांपर्यंत या अभियानामार्फत पोहोचविण्यात येत आहे. त्यातून अनेक समाजोपयोगी उपक्रम ज्यातून लोकांच्या उपजिविकेसारखे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले जात आहे,असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम समन्वयक किरण बोन्नेरे यांनी केले. निकेश आमने यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगितला. तर प्रकल्प समन्वयक सतिष खंदारे यांनी सुत्रसंचालन केले.

### गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर परिपूर्ण नियोजन करा: जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

उन्हाळ्यात जलसाठ्यांमधील गाळ काढणे व तो शेतकऱ्यांच्या शेतात टाकून शेताची सुपिकता वाढविण्यासाठी गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार हे अभियान राबविण्यात येते. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर परिपूर्ण नियोजन करा. त्यासाठी गुरुवार दि.२० रोजी प्रत्येक तालुक्यात बैठक घेऊन नियोजन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. गाळमुक्त धरण- गाळयुक्त शिवार योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात आज जिल्हास्तरीय समितीची बैठक झाली. बैठकीस उपजिल्हाधिकारी रोहयो उमाकांत पारधी, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, तसेच भारतीय जैन संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष ॲड. गौतम संचेती, राज्य महासचिव प्रवीण पारख, जिल्हा प्रकल्प प्रमुख किशोर ललवाणी, पारस बागरेचा, जिल्हाध्यक्ष राजेंद्र पगारिया, अभिजीत हिरप आणि गौतम भंडारी यांची उपस्थिती होती. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आदी दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

दैनिक मराठवाडा पत्र
epaper.marathwadapatra.com
गुरूवार, दि.२० मार्च २०२५


## उमेद तर्फे गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार व खाद्य जत्रा स्वयंसहायता बचत गटांचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २० ते २४ मार्च २०२५ दरम्यान

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान दिनांक २० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत वेळ सकाळी १० ते रात्री ११ वाजेपर्यंत उत्सव स्वयंसहायता समूहातील महिलांच्या प्रगतीचा, उत्सव महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव ईद बाजार व खाद्य जत्रा आणि जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ जिल्हा परिषद बीड येथे आयोजित करण्यात आलेले आहे. खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले असून प्रवेश विनामुल्य आहे. तरी सर्व जनतेने याचा लाभ घेऊन एकवेळ अवश्य भेट द्यावी असे आवाहन डी आर डी ए च्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे.

# बोगस पीकविमा घोटाळा करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, मकोका लावा : धनंजय गुंदेकर

### ● बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

पीक विमा योजनेत बोगसगिरी करणारे रॅकेट बीड जिल्हयात अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. या संदर्भात सातत्याने बीड जिल्ह्यातील विविध शेतकरी संघटना, दैनिके, यांनी पाठपुरावा केला आहे. अगदी कॅग ने देखील त्याची दखल घेतली होती. त्यानंतर पुन्हा असे प्रकार उघडकीस आले, त्यावेळी बोगसगिरी करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शिफारस करण्यात आली होती.

मात्र राजकीय इच्छाशक्ती कमी पडली होती. आता विधानमंडळातील दोन्ही सभागृहात हा विषय चर्चिला गेला असून यात दोषी असणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत अशी मागणी शेतकरी नेते धनंजय गुंदेकर यांनी केली आहे. याच बोगसगिरीमुळे पात्र असलेल्या शेतकऱ्यांना पीकविमा पासून



वंचित राहावे लागते आहे.. किती दिवस ह्या बोगसगिरी करणाऱ्यांचे लाड पुरवले जाणार आहेत? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

आतापर्यंत पीकविमा मध्ये बोगसगिरी करणाऱ्यांवर कारवाई झाली नाही, त्यातूनच मग अशी बोगसगिरी करणारांचे सातत्याने फावत गेले आहे. अशी बोगसगिरी करणारे लोक एकूण शेतकऱ्यांच्या एक टक्का देखील नाहीत, पण त्यांच्यामुळे संपूर्ण जिल्हा बदनाम होतो. त्यामुळे अशी बोगसगिरी करणारे शेतकरी, दलाल, सीएससी सेंटर चालक आणि त्यांना मदत करणाऱ्या सर्वावरच संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्याखाली कठोर फौजदारी कारवाई व्हायला हवी अशी मागणी धनंजय गुंदेकर यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## १०० रुपयांच्या मुद्रांक विक्रीबद्दलचा संभ्रम दूर करून विक्री सुरू करा!

## नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी राजेभाऊ फड यांचे प्रशासनाला निवेदन

**परळी वै. । प्रतिनिधी**

विविध शासकीय कामासाठी वापरण्यात येणारे १०० रुपयांचे मुद्रांक विक्रीच्या अनुषंगाने झालेल्या शासकीय आदेशाबाबत अद्याप नेमकी स्पष्टता आलेली दिसत नाही. १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री शासनाने स्थगित केली असल्याचा शासन आदेश दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला आहे. असे असताना संबंधित



मूल्याच्या मुद्रांकाची इतर काही जिल्ह्यांत विक्री अद्यापही चालू आहे. मात्र परळी वैजनाथ तालुक्यात १०० रुपयांचा मुद्रांक मिळत नाही. त्यामुळे याबाबत नागरिकांत मोठा संभ्रम निर्माण झाला असून गैरसोय टाळण्यासाठी प्रशासकीय पातळीवरून योग्य तो निर्णय घेऊन मुद्रांक विक्री सुरू करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. परळी तालुक्यातील नागरिकांनी १०० रुपयांच्या मुद्रांकाविषयीच्या तक्रारी आणि शंका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे मांडल्या असता त्यांनी परळीचे दुय्यम निबंधक श्रेणी - १ यांना निवेदन सादर केले आहे. यात म्हटले आहे की, १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री बंद करण्याचे शासनाने आदेश काढले आहेत. असे असतानाही राज्यातील अनेक जिल्ह्यात त्या मुद्रांकाची विक्री आजही सुरू आहे. काही जिल्ह्यात मुद्रांक विक्री सुरू ठेवून काही जिल्ह्यात ती बंद ठेवण्यात आल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. जर विक्री चालू असलेल्या जिल्ह्यात १०० रुपयांचे मुद्रांक वापरून शासकीय कामे होत असतील तर ते बीड जिल्ह्यात का होत नाहीत? परळीत सदरील मुद्रांक भेटत नसल्याने नागरिकांची अनेक शासकीय कामे खोळंबली आहेत. काही दिवसांपूर्वी जिल्हा प्रशासनाची बैठक झाल्यानंतर १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री सुरू करू असे आश्वासन मुद्रांक विक्रेत्यांना मिळाले असल्याचे समजते. मात्र त्याबाबत काहीही निर्देश दिले गेले नाहीत. तरी आपण शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी राजेभाऊ फड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## पाण्याचा काटकसरीने वापर करून उत्पादनात वाढ करण्याची बोरखेड येथे शेतकऱ्यांनी घेतली शपथ

### पाणी हेच आपले जीवन आहे - जलप्रेमी बाजीराव ढाकणे



**बीड । प्रतिनिधी**

रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी जलजागृती सप्ताहानिमित्त मौजे बोरखेड ता जि बीड येथील यशोदिप शेतकरी बचत गटांच्या शेतकरी सदस्यांनी सहभागी होत आपल्या गावातील सर्व शेतकरी बांधवांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याची गरज आहे अशी संकल्पना करून सर्वांनी मिळून पाण्याचा काटकसरीने वापर करूया असा निर्णय घेत शपथ घेतली. यावेळी जलप्रेमी बाजीराव ढाकणे, बाळासाहेब गावडे यांच्यासह यशोदिप शेतकरी बचत गटांचे अध्यक्ष रामचंद्र शिंदे, सचिव विठ्ठल घरत, सदस्य विठ्ठल शिंदे, महादेव गावडे, आदम खॉ पठाण, बाबु बोराटे सुशिल बोराटे, गोरख अनपट, दत्ता सोनटक्के, खंडु सगळे इत्यादींची उपस्थिती होती.

**राज्यात १६ मार्च ते २२ मार्च दरम्यान साजरा केला जातो जलजागृती सप्ताह या निमित्ताने आपणही पाणी जपून वापरले पाहिजे. पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीसाठी पाणी आवश्यक आहे. मानव, प्राणी, वनस्पती आणि संपूर्ण पर्यावरणाच्या संतुलनासाठी पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. - जलप्रेमी ,बाजीराव नवनाथ ढाकणे**

## बोरखेडच्या बिनविरोध सरपंच अपात्र

### ॲड.के.एस. पंडित यांचे मुद्दे ग्राह्य धरून निकाल

**बीड । प्रतिनिधी**

१९८४ साली केलेल्या अतिक्रमणामुळे बोरखेडचे बिनविरोध सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना जिल्हाधिकारी बीड यांनी अपात्र केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की बोरखेड सरपंचा विरोधात माजी सरपंच शहादेव हिंदोळे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ ज ३ व १६ अन्वये तक्रार दाखल केली होती. बोरखेडचे सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांनी गट नंबर १९७ मध्ये सन १९८४ साली अतिक्रमण केले असून तेव्हापासून सदरील जमीन वहीती करत आहे तसेच १९९२ ९३ मध्ये अतिक्रमण प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे देखील एडवोकेट के एस पंडित यांनी निदर्शनास आणून दिले.पंडित साहेबांना ॲड सुनिल वडमारे,ॲड.नागेश तांबारे, ॲड.अक्षय मुळे, ॲड.अभिजीत कदम यांनी सहकार्य केले. अतिक्रमण प्रकरणात बोरखेड सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना अपात्र करण्याचे आदेश माजी जिल्हाधिकारी बीड यांनी दिले आहेत.

## गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष झाल्या मुळे शिवसेनेच्या व सर्व समाज बांधवांच्या वतीने रतन गुजर यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ



यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

▶▶ उर्वरित पान २ वर

## केरसुनीच्या व्यवसायातून मुलाला घडवले

### नाकलगाव चा संजय गायकवाड महाराष्ट्र सुरक्षा बलात दाखल

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

आई-वडीलांनी गावोगावी व रानोमाळ भटकून केरसुनी (झाडू) बनवण्यासाठी लागणारी झाडी (सिंधीची पनाळी) तोडून बनवलेल्या झाडु - दुरडीच्या विक्रीतुन मिळणाऱ्या मोजक्या पैशातून मुलगा मोठा अधिकारी होण्याचे बघितलेले स्वप्न मुलाने पुर्ण केले. महाराष्ट्र सुरक्षा बलात नाखलगाव चा संजय दाखल होत आहे. सर्वसामान्य गायकवाड कुटुंबातील संजयच्या या यशाचं



सर्वत्र कौतुक होत आहे.

माजलगाव तालुक्यातील नाखलगाव येथील मसाजी गायकवाड यांचा केरसुणी व दुरडी बनवण्याचा परंपरागत व्यवसाय आहे. अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गायकवाड यांना आपल्या मुलाने सरकारी अधिकारी व्हावे अशी इच्छा होती. आई जाईबाई व वडील मसाजी गायकवाड यांनी रानावनात भटकत झाडू व दुरडी साठी लागणारी सिंधीची झाडी गोळा करून व अपार कष्ट करून विक्री केलेल्या झाडू - दुरडी च्या विक्रीतून मिळालेल्या पैशातून संजय या मुलाचे संगोपन केले. गतवर्षी धुळे येथील एम एस एफ कॅम्प ▶▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी 'शेतकरी सहवेदना दिवस'

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हि राष्ट्रीय आपत्ती असुन आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी सिलिंग, आवश्यक वस्तु, जमीन अधिग्रहण कायदे रद्द करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे,मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतुन आपल्या ४ लहान मुलांसह सामुहिक आत्महत्या केली होती.या सामुहिक आत्म हत्येची शासन दरबारी पहिली



शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झाली.या घटनेला यावर्षी ३९ वर्षे पूर्ण झाली आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड पोलिसांच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात. तर महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ शेतकरी आत्म हत्या करून मृत्युला कवटाळतात. बीड जिल्ह्यात २०१४ ते २०२४ या १० वर्षाच्या कालावधीत २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून

▶▶ उर्वरित पान २ वर




# वर्तमान पत्राच्या बातम्या ची माजलगाव पोलिसां कडून दाखल

# मिलन डे मटक्यावर धाड, अनेकावर केले गुन्हे दाखल

### पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईमुळे माजलगाव शहरातील जनतेकडून होत आहे समाधान व्यक्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील मटका बंद व्हावा म्हणून माजलगाव तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने प्रयत्न करण्यात आले होते जवळपास सर्वच वर्तमानपत्रात बातम्या छापून आल्या होत्या याचीच दखल घेत माजलगाव पोलिसांनी आज धडाकेबाज कारवाई करत मिलन डे च्या मटका घेणाऱ्या तिघांवर कार्यवाही केली त्याबाबत माजलगाव पोलिसात



गुन्हाही दाखल झाला माजलगाव पोलिसाच्या या जनहितार्थ कारवाईमुळे माजलगाव शहरवाशीयांकडून पोलिसांचे अभिनंदन करण्यात येत असून सर्वसामान्य महिला वर्गाकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

माजलगाव शहरातील शहरातील मटका बंद करावा म्हणून माजलगाव येथील पत्रकारांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे मागणी केली होती तशा आशयाच्या बातम्या अनेक वर्तमानपत्रातून प्रकाशित झाल्या आणि माजलगाव पोलीस प्रशासन खडबडून जागत झालं दिनांक १८/०३/२०२५ रोजी शहरातील मिलन डे नावाचा मटका घेणाऱ्या तीन मटका जुगार मालक यांच्यावर धडाकेबाज कारवाई केली या कारवाईमध्ये बुक्की मालक सलीम शेख, असेफ शेख, आणि इरशाद शेख या तिघांवर कार्यवाही करून नवीन कायद्या नुसार माजलगाव पोलीस ठाणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यांच्याकडून ४०२२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून माजलगाव पोलिसांनी सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, चेतना तिडके, नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शना नुसार माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, के बी माकने, माधव तोटेवाड यांनी केली आहे माजलगाव पोलिसांचे या धडाकेबाज कार्यवाहीमुळे सर्वत्र अभिनंदन होत आहे आणि गोरगरीब मजूर कुटूंब व महिलांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात येत आहे मात्र माजलगाव पोलिसांची कार्यवाही एवढ्यावरच न थांबता नियमितपणे चालू राहिली तर निश्चितच आमचे संसार नावारूपाला येतील बोलत आहेत.

